# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>

## लक्ष्मी पूजनाची सभा

प्रिय सभासद बंधू भगिनीनो,

आपल्या संस्थेच्या वतीने सालाबादप्रमाणे "श्री लक्ष्मीपूजनचा कार्यक्रम" सोमवार दिनांक 23 ऑक्टोबर 1995 रोजी आपल्या संस्थेचे सदस्य श्री मधूकर संभाजी राणे यांचे निवास स्थानी आयोजित करण्यात आलेला आहे. तरी सर्व सभासद बंधु / भगिनींन विनंती करण्यात येते की सर्वांनी वेळेवर उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी.

आपला

सुनिल सदानंद राणे
चिटणीस

# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>
## लक्ष्मी पूजनाची सभा

**दिनांक** : सोमवार 23 ऑक्टोबर 1995
**स्थळ** : श्री मधुकर संभाजी राणे, अभ्युदय नगर, बिल्डिंग नं. 13, काळाचौकी, मुंबई – 400 013 यांचे घर

उपस्थिती

| | |
|---|---|
| 1. श्री सुनिल सदानंद राणे | 10. श्री मधुकर संभाजी राणे |
| 2. श्री प्रकाश हरिश्चंद्र राणे | 11. श्री हेमंतकुमार रमेश राणे |
| 3. श्री भास्कर दौलत राणे | 12. श्री उत्तम वामन राणे |
| 4. श्री एस टी राणे | 13. श्री दिलीप मधुकर राणे |
| 5. श्री वासूदेव बाबू राणे | 14. श्री यशवंत तुकाराम सावंत |
| 6. श्री दत्ताराम विष्णू राणे | 15. श्री विठोबा नाना राणे |
| 7. श्री सुरेश रघुनाथ राणे | 16. श्री शिवाजी त्रिंबक राणे |
| 8. श्री श्रीधर आत्माराम राणे | 17. श्री दशरथ शिवाजी राणे |
| 9. श्री प्र आ राणे | |

उपरोक्त संस्थेच्या सार्वजनिक लक्ष्मीपूजनाचा कार्यक्रम संस्थेचे सदस्य श्री मधुकर संभाजी राणे यांच्या निवासस्थानी यशासांग पार पडला. एकूण 17 सभासद या बैठकीस उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष मा श्री प्रताप विठोबा राणे हे अनुपस्थित असल्यामुळे संस्थेचे जुणे जाणते कार्यकर्ते श्री साबाजी त्रिंबक राणे यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

लक्ष्मीपूजनाचा मुहूर्त थोडा उशीरा असल्यामुळे अध्यक्षांच्या परवानगीने वाडीतील समस्यांची चर्चा करण्यात आली. या प्रसंगी श्री दत्ताराम विष्णु साटम, श्री सुरेश रघुनाथ राणे व श्री श्रीधर आत्माराम राणे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

खालील मुद्यांवर विशेषत: चर्चा करण्यात आली.

1) नळपाणी योजना
2) टेंब विहीर व ब्राह्मण विहीर यांची दुरुस्ती व देखभाल
3) जिल्हा परिषदेच्या योजने अंर्तगत सुधारीत चूल मिळणे
4) फळसेवाडी, पिसेकामते शाळा क्रमांक 2 या शाळेच्या इमारतीस भाडेतत्वावर जिल्हा परिषदेस देणे
5) वाडीतील स्ट्रीटलाईट दुरुस्ती तसेच केलेल्या खर्चाचा ग्रामपंचायतीकडून परतावा मिळावा
6) श्री क्षेत्र माडाचे पाणी येथे बंधारा उभारणे
7) फळसेवाडी शाळा क्रमांक 2 ते वाडीस जोडणारा रस्ता याचे खडीकरण किंवा डांबरीकरण करणे तसेच वाडीतील इतर रस्ते या मुख्य विषयांवर चर्चा झाली.

वरील उल्लेख केलेल्या विषयांमध्ये चिटणीस व गावाहून आलेले सदस्य श्री सुरेश रघुनाथ राणे यांनी पुढील कामाच्या प्रगतीची माहीती दिली. या चर्चेमध्ये श्री दत्ताराम विष्णु साटम, श्री प्रकाश हरिश्चंद्र राणे, श्री वासुदेव बाबू राणे, श्री सुरेश रघुनाथ राणे इत्यादि मान्यवर सभासदांनी चर्चेत भाग घेतला.

अवांतर विषयांमध्ये स्ट्रिट लाईट बद्दल असा निर्णय घेण्यात आला की ग्रामपंचायतीकडून जी रक्कम मिळेल त्या रक्कमेतून व्यवस्थित दुरुस्ती कराव्यात व इतर कामांबाबत श्री सुरेश रघुनाथ राणे यांनी पुढाकार घेऊन कामे मार्गी लावावी. तसेच श्री सुरेश रघुनाथ राणे यांनी संस्थेस विनंती केली की कुणी देणगीदार भेटल्यास शाळेसाठी कौले, झेंडावंदनासाठी चौथरा, स्टिलचा खांब व कपाट ह्या वस्तू घ्याव्यात. तसेच त्यांनी असेही पुढे सांगितले की त्यांच्याकडे असलेल्या जमा रक्कमेतून शाळेचे कंपाऊन्ड फळसेवाडी शाळा ते म्हसकर हाऊस (कॉर्नर) पर्यंत रस्ता करून घेतला आहे व खडीकरण प्रयत्न चालू आहे. श्री दत्ताराम विष्णु साटम यांनी अशी सूचना मांडली की गतवर्षीच्या लक्ष्मीपूजनाच्या मिटींगमध्ये देवाच्या तरंगाबद्दल चर्चा झाली त्याप्रमाणे तरंग खरेदी करून दसऱ्याच्या मुहूर्तावर देण्यात आले. देवळाला कपाटाची आवश्यकता आहे. कुणा देणगीदारास दयायचे असल्यास द्यावे. तसेच वाडीतील अंर्तगत पायवाटा दुरुस्त करण्याबाबत देखील चर्चा करण्यात आली.

ह्या सर्व चर्चा खेळीमेळीने पार पडल्या, लक्ष्मीपूजन श्री मधुकर संभाजी राणे यांच्या हस्ते पार पडले. या प्रसंगी फराळ व चहापाणी याची व्यवस्था ठेवली होती.

सभेचे अध्यक्ष श्री साबाजी त्रिंबक राणे यांनी लक्ष्मीपूजनाचा कार्यक्रम व वरील सर्व चर्चा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडून घेतली. शेवटी सर्व उपस्थितांचे, रुम मालकांचे आभार मानून ही सभा सायंकाळी 7:15 वाजता संपली असे अध्यक्षांनी जाहीर केले

---

श्री सुनिल सदानंद राणे
चिटणीस